GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 1 | JULY – 2022

# वेदोक्त प्रकरण : राजर्षी शाहू महाराज आणि अस्पृश्यता निवारण

प्रा. डॉ. आलटे आर. एन.
समाजशास्त्र विभाग प्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा,
ता. मंठा, जि. जालना.

## प्रस्तावना :–



राजर्षी छत्रपती शाहु महाराजांनी राज्याचा पदभार स्वीकारल्यानंतर, कारभाराची सर्व सुत्रे हातात घेतल्यानंतर एक स्वतंत्र सार्वभौम राजा या नात्याने राज्याची पाहणी करण्यास सुरुवात केली. त्यासाठी संपूर्ण राज्यभर दौरा केला व राज्यातील सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, सांस्कृतिक स्थिती, कला, क्रीडा, साहित्य, नाट्यकला, शिल्पकला, शासन प्रशासनातील स्थिती, कृषी, सिंचन व्यवस्था आदि सर्वांची पाहणी केली, सर्व गोष्टींचा अभ्यास केला, चिंतन केले व वरील सर्व क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना करण्याचे ठरविले अशातच एक विचित्र घटना त्यांच्या जीवनात घडून आली.

## वेदोक्त प्रकरण :–

प्लेगच्या साथीने 1899 हे वर्ष जसे गाजले तसेच ते वेदोक्त प्रकरणानेही गाजले. वेदोक्त प्रकरण नेमके काय आहे? नोव्हेंबर 1899 मध्ये कार्तिक स्नान करण्यासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराज पंचगंगा नदीवर गेले, पहाटेची वेळ होती, त्यांच्या हातावर शिवलिंग गोंदलेले होते. स्नानानंतर ते त्याची पूजा करायचे. या पंचगंगेवरील कार्तिक स्नानाच्या वेळी त्यांच्या सोबत त्यांचे बंधू बापूसाहेब महाराज, मामासाहेब खानविलकर व मुंबईचे राजारामशास्त्री भागवत उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराज पंचगंगेत स्नान करतेवेळी, मंत्र म्हणण्यासाठी त्यांचा पुरोहित नारायण भट असायचा, परंतु त्या दिवशी नारायण भट हा त्यांचा पुरोहित उपस्थित नव्हता. तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी पुरोहिताला हजर करण्याचा आदेश दिला व लगेच दरबारी मंडळी राजपुरोहिताला अर्थात नारायण भटाला घ्यायला त्यांच्या घरी पोहोचली. आश्चर्य म्हणजे त्यावेळी नारायण भट घरीही उपस्थित नव्हता. तेव्हा दरबारी मंडळींनी राजपुरोहित नारायण भटाच्या बायकोला विचारणा केली, तेव्हा ती मोठ्या त्वेषाने म्हणाली, “गेला असेल शेण खायला” या वाक्याचा निट अभ्यास केला तर लक्षात येईल की, पुरोहिताची बायको पुरोहितावर फारच चिडलेली दिसत होती, शिवाय ती असेही म्हणते की, “गेला असेल शेण खायला” बायको ज्यावेळी आपल्या नवऱ्याबद्दल असे बोलते, तेव्हा ते शेण वेगळ्या प्रकारचे असते हे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. तसे सर्व ब्राम्हण मिळून श्रावण महिन्यात शेण खाण्याचा कार्यक्रम करतात. ते श्रावण महिण्यात पंचगव्य अर्थात गायीचे पाच पदार्थ त्यात म्हणजे गायीचे शेण व मुत्र

सक्तीचे असते, उदा. दुध, दही, लोणी, शेण व मुत्र याला ते पंचगव्य म्हणतात आणि श्रावण महिन्यात ते सर्वजण आनंदाने खातात.

लो. टिळक एकदा विदेशात गेले आणि समुद्र बंदीचे उल्लंघन केले म्हणून त्यांना असाच पंचगव्याचा म्हणजे शेणाचा गोळा प्रायश्चित म्हणून गिळावा लागला होता. तर राजपुरोहित नारायण भट जो शेण खायला गेला होता ते वेगळे शेण होते ते गायीच्या पंचगव्यातील शेण नव्हते. तर ती दरबारी मंडळी हा राजपुरोहित नारायण भट जेथे शेण खायला गेला होता, तेथे पोहचली तर हा राजपुरोहित नारायण भट एका वेश्येच्या घरी शेण खात होता आणि विशेष म्हणजे दारू पिवून, नशेत शेण खात होता. दरबारी मंडळींनी त्याला तसेच उचलले व गाडीत टाकले. कारण छत्रपती शाहू महाराजांचा तसा आदेशच होता. त्याने आंघोळही केली नव्हती आणि तो पंचगंगेच्या काठावर उभे राहून मंत्र म्हणू लागला, हा राजपुरोहित दारू प्यायलेला होता, वेश्येच्या घरातून आला होता. शिवाय आंघोळही केली नव्हती आणि मंत्र उच्चारण करीत होता, आणि विशेष म्हणजे तो वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्राचा उच्चार करीत होता. मंत्राचे दोन प्रकार आहेत (1) वेदोक्त मंत्र, (2) पुराणोक्त मंत्र.

वेदोक्त मंत्र – पवित्र असतात, शुभ असतात, मंगल असतात आणि ते केवळ ब्राम्हणांसाठी असतात. तर पुराणोक्त मंत्र हे अशुभ असतात, अमंगल असतात आणि ते केवळ शुद्रांसाठी असतात. अतिशुद्र आणि गुन्हेगार जातींना कोणतेच मंत्र नसतात. कारण युरेशियन ब्राम्हण त्यांना मानव म्हणून मानतच नाहीत.

असे पुराणोक्त मंत्र तो राजपुरोहित नदीच्या काठावर उभे राहून म्हणत होता. त्याने आंघोळही केलेली नव्हती. तो दारू पिलेला होता व सर्वात कळस म्हणजे तो वेश्येच्या घरातून तसाच आला होता. तो राजपुरोहित नारायण भट पुराणोक्त मंत्र उच्चारत आहे हे राजारामशास्त्री भागवत यांच्या लक्षात आले व त्यांनी ही बाब छत्रपती शाहू महाराजांच्या निदर्शनास आणून दिली, तेव्हा त्यांनी आंघोळ करतांना राजपुरोहिताला विचारले, "पुरोहीत तुम्ही आंघोळ केली का?" तो म्हणाला "नाही", पुन्हा शाहू महाराजांनी दुसरा प्रश्न विचारला "तुम्ही कोणते मंत्र म्हणत आहात?" त्यावर तो म्हणाला, ''पुराणोक्त मंत्र'' महाराज कडाडले व म्हणाले "आम्ही शिवाजी महाराजांचे वारस आहोत. आम्ही क्षत्रिय आहोत आणि तुम्ही पुराणोक्त मंत्र म्हणत आहात" त्यावर तो राजपुरोहित म्हणाला, "महाराज तुम्ही शुद्र आहात आणि शुद्रांसाठी फक्त पुराणोक्त मंत्रच असतात आणि अशा मंत्राचा उच्चार करण्यासाठी आम्हा ब्राम्हणांना आंघोळ करण्याची आवश्यकता नसते, कारण आम्ही जन्मजात पवित्र असतो आणि शुद्रांना वेदोक्त मंत्राचा अधिकार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना आम्ही क्षत्रियात्वाची तात्पुरती सवलत दिली होती, जोपर्यंत सर्व शक्तीमान ब्रम्हवृंद आपणांस क्षत्रिय मानीत नाही तोपर्यंत आपण शुद्रच आहात."

राजर्षी शाहू महाराजांना क्षणभर अंगावर वीज कडाडल्यासारखे वाटले. दस्तुरखुद छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारसदाराला एक सामान्य पुरोहित शुद्र म्हणून अपमानीत करीत होता. त्यावेळी महाराजांना असे वाटले की, ज्या समाजात माझ्यासारख्या राजपरिवारातील लोक शुद्र म्हणून गणले जात असतील तर महार, मांग, चांभार ज्यांना शेकडो वर्षापासून शुद्रातिशुद्र म्हणून गणले होते त्यांच्याबरोबर हा ब्राम्हण वर्ग कसा व्यवहार करीत असेल? या एकाच विचाराने त्यांच्या काळजात चर्रर झाले. या प्रसंगाने छत्रपती शाहू महाराजांना खूप वाईट वाटले, त्यांचे मन हेलावले, त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला, त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली, त्यांचे सर्वांग थरथरू लागले, ते अस्वस्थ झाले, ते बेचैन झाले. कारण हा घोर अपमान होता, तो अपमान त्यांना सहन होत नव्हता. अपमानाचा एक सिध्दांत आहे, "जे लोक स्वाभीमानी असतात त्यांनाच अपमान कळतो, लाचार, पाय चाटणाऱ्याला, लाळ घोटणाऱ्याला, जी–हुजरी करणाऱ्याला अपमान कळत नसतो, कारण त्यांच्यात स्वाभिमान नसतो."

युरेशियन ब्राम्हण भारतातील सर्व ब्राम्हणेत्तरांना पशू समजतात ही गोष्ट छत्रपती शाहू महाराजांना सहन झाली नाही व त्यांनी या व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविण्याचे, बंड करण्याचे ठरविले. आज माझा अपमान झाला येथून पुढे कोणाचाच अपमान होणार नाही अशी व्यवस्था निर्माण करण्याचे ठरविले.

या वेदोक्त प्रकरणात सर्व ब्रम्हवृंद छत्रपती शाहू महाराजांच्या विरोधात एकत्र आला, शेवटी 5 वर्षांनी शाहू महाराजांच्या बाजूने न्यायालयाचा निकाल आला.

या वेदोक्त प्रकरणावरून एका नवीन वादळाने जन्म घेतला, त्या वादळाने मानवनिर्मीत कृत्रिम व्यवस्थेला धक्के देत संपूर्ण समाजजीवन ढवळून काढले. नवसमाजनिर्मीती गतिमान झाली आणि मरगळलेल्या समाजात नवचैतन्य निर्माण झाले. 19 व्या शतकात महात्मा फुले यांनी हाती घेतलेल्या कार्याची धुरा महाराजांच्या हाती आली आणि त्यांनी आपल्या सर्व शक्तिनिशी चातुर्वर्ण्य व्यवस्थेला आव्हान दिले. त्या दृष्टीने आपल्या संस्थानच्या कारभारास, ध्येयधोरणास दिशा देण्याचा प्रयत्न केला.

## कार्य :–

" राजर्षी शाहू महाराजांनी विषमतेवर पहिला प्रहार केला तो जातीयतेला आव्हान देवून. गंगाराम कांबळेच्या हॉटेलात जावून स्वतः चहा घेतला, आणि राजा जर अस्पृश्यता पाळत नाही, तर समाजाने का पाळावी हा संदेश देवून टाकला " अशा छोट्या छोट्या प्रसंगामधून राजर्षी शाहू महाराजांच्या मनाच्या उंचीची कल्पना येते. शिवाशीव व विटाळासारख्या खुळचट कल्पनांना त्यांनी विरोध केला.

## समारोप :–

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी वेगवेगळे उपाय योजले, "करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात. त्या सर्व शाळा दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात आणि अस्पृश्यांच्या मुलास सरकारी शाळातून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे, सरकारी शाळातून शिवाशिव पाळण्याची नसल्याने सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविले जावे." पुढे त्यांनी इशारा दिला की, सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्याही शाळेत एखादा अस्पृश्य वर्गाचा विद्यार्थी आला तर, संभावित गृहस्थाप्रमाणे आदरपूर्वक वागवून त्याला शाळेत घेण्यात यावे. शाळा खात्यातील कोणा इसमाची जर असे करण्यास हरकत असेल तर त्याने हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्याच्या आत आपला राजीनामा पाठवावा, तर त्याला पेन्शन मिळणार नाही, जर या कायद्यास मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थांची हरकत असेल तर त्यांचीही ग्रॅंट किंवा इतर मदत दरबार बंद करील.

आपल्याला मिळालेल्या अधिकाराचा वापर करून राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता मुळापासून नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले, प्रसंगी कायदे करून ते कठोरपणे राबविण्यात आले. राजर्षी शाहू महाराजांनी वेदोक्त प्रकरणात झालेल्या मानहानीचा बदला संस्थानात बहूजनोध्दाराचे कार्य हाती घेवून त्यांच्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून, कायदे करून, वसतीगृहांची निर्मिती करून मोफत शाळा आणि नोकऱ्यांमध्ये बहूजनांना 50 टक्के आरक्षण देवून घेतला.

## संदर्भ :–

1. लट्ठे आ.बा. : श्री. शाहू छत्रपती यांचे चरित्र, टाईम्स ऑफ इंडीया प्रेस, मुंबई, 1924
2. सूर्यवंशी कृ. गो. : राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे
3. पवार जयसिंगराव : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, 2001
4. बागल भाई माधवराव : शाहू महाराजांच्या आठवणी, अध्यक्ष, भाई माधवराव बागल विद्यापीठ, कोल्हापूर, 2004
5. नाईक तु. बा. : छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिकेशन हाऊस, सदाशिव पेठ, पुणे, 2005